जिल्हापरिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी तयार करण्यात आलेल्या निवडणूक विभागनिहाय / निर्वाचक गणनिहाय मतदार यादीमधील चुका दुरुस्त करणेबाबत.

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २५ जानेवारी, २०१७

## आदेश

क्रमांक - रानिआ/ जिपपंस-२०१७/ प्र.क्र.११/ का.७ ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए व महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील कलम ९-अ मधील तरतुदीनुसार राज्यातील जिल्हापरिषदा व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करण्यासंदर्भातील अधिक्षण, संचालन व नियंत्रण व त्या सर्व निवडणुका घेण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आली आहे.

२. आणि ज्याअर्थी; महाराष्ट्र जिल्हापरिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील कलम १३ मधील तरतुदीनुसार जिल्हापरिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी, राज्य निवडणूक आयोग याबाबत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे अधिसूचित करेल, त्या तारखेस अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी निवडणूक विभागनिहाय / निर्वाचक गणनिहाय विभागून व अधिप्रमाणित करुन वापरावयाची आहे.

३.	आणि ज्याअर्थी; वरील तरतुदीप्रमाणे मतदार यादी तयार करताना, विधानसभेच्या मतदार यादीनुसार, काही मतदारांची नावे ज्या निवडणूक विभाग / निर्वाचक गणामध्ये समाविष्ठ असणे आवश्यक आहे, त्या ऐवजी त्या मतदारांची नावे अन्य निवडणूक विभाग / निर्वाचक गणामध्ये चुकीने समाविष्ठ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच जिल्हापरिषद व पंचायत समिती क्षेत्रासाठी राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीत नाव असून देखील निवडणूक विभाग निहाय / निर्वाचक गणनिहाय मतदार यादी विभागून अधिप्रमाणित करताना, काही मतदारांची नावे कोणत्याही निवडणूक विभागात / निर्वाचक गणामध्ये समाविष्ट करण्याचे राहून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

४.	त्याअर्थी;भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के, महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम ९-अ(४) तसेच यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

(i) हे आदेश राज्यातील सर्व जिल्हापरिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी लागू राहतील.

(ii) विधानसभा मतदार यादीवरुन जिल्हापरिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी निवडणूक विभागनिहाय / निर्वाचक गणनिहाय तयार करण्यात आलेली मतदार यादी अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करण्यात आल्यानंतर काही मतदारांची नावे ज्या निवडणूक विभागात / निर्वाचक गणात असणे आवश्यक आहे, त्याऐवजी अन्य निवडणूक विभाग / निर्वाचक गणाच्या मतदार यादीत चुकीने समाविष्ट करण्यात आलेली असल्यास अथवा राज्य निवडणूक आयोगाने अधिसुचित केलेल्या तारखेस

संबंधित निवडणूक क्षेत्राच्या विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असून देखील त्यांची नावे जिल्हापरिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी तयार करण्यात आलेल्या निवडणूक विभाग निहाय / निर्वाचक गणनिहाय मतदार यादीत समाविष्ट करावयाचे राहून गेली आहेत असे निदर्शनास आल्यास, मतदार यादी अधिप्रमाणित करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेल्या अधिकाऱ्याने याबाबत योग्य त्या दुरुस्त्या पुरवणी यादीच्या स्वरुपात कराव्यात.

(iii) वरील स्वरुपाच्या दुरस्त्या जिल्हापरिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीचे नामनिर्देशनपत्र भरण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत करता येतील. मात्र याचा अर्थ असा नव्हे की, मतदार यादीत नविन नावे समाविष्ठ करणे अथवा वगळण्याची परवानगी देण्यात आलेली आहे.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१) सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
२) सर्व निवडणूक कार्यासने, राज्य निवडणूक आयोग.
३) निवड नस्ती.